# प्रकरण पहिले
# प्रास्ताविक

१ . १ विषय प्रवेश

१ . २ संशोधनाचा विषय

१ . ३ संशोधनाची उद्दिष्टे

१ . ४ संशोधनाची गरज व महत्व

१ . ५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१ . ६ प्रकरणाचे सुसूत्रीकरण

संदर्भ

# प्रकरण पहिले
# प्रास्ताविक

## १.१ विषय प्रवेश :-

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना १९३४मध्ये झाली. कै. कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांनी समाजहिताच्या दृष्टीने, खेड्यापाड्यातील गोरगरीब जनतेच्या शिक्षणाच्या हेतूने श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था बार्शी येथे स्थापन केली, ही संस्था एका ध्येयवादी व्यक्तीने स्थापन केलेली आहे त्यामुळे या संस्थेचे कार्य समाजहित समोर ठेवूनच चालले आहे.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी सोलापूर जिल्ह्याच्या व उस्मानाबाद जिल्ह्याच्या काही भागात समाज सुधारण्यासाठी, शिक्षणाच्याप्रसारासाठी खूप परीश्रम घेतले कर्मवीर मामांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कडून या कार्याची प्रेरणा घेतली.

संशोधकाने याच संस्थेमध्ये इयत्ता अकरावी पासून ते एम.एड. पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. संशोधक या संस्थेच्या 'जिजामाता कन्या प्रशाला ' या बार्शी येथील शाखेमध्ये जून १९९० पासून अध्यापनाचें कार्य करीत आहे. त्यामुळें या संस्थेच्या कार्याची संशोधकाला ओळख आहे.१९३४ साली स्थापन झालेल्या या संस्थेमध्यें आज एकूण २६ शैक्षणिकशाखा आहेत. संस्था स्थापन झाल्यापासून ते आज पर्यंत या संस्थेच्या कार्यांत उत्तरोत्तर प्रगती होत गेली आहे. ही संस्था यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. ही वाटचाल यशस्वी होण्यामागें या संस्थेचे शैक्षणिक नियोजन नेमके कसे आहे व त्याची अंमलबजावणी कशी केली जाते हे जाणून घेण्याची संशोधकास उत्सुकता होती म्हणून संशोधकाने पुढील विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## १.२ संशोधनाच्या विषय : -

'श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, या संस्थेच्या शैक्षणिक नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास '

संशोधन विषयाची मांडणी करताना विविध शब्दांचा वापर झाला आहे. या शब्दरचनेचा अर्थ, विषय स्पष्ट होण्यासाठी व विषयाची व्याप्ती समजण्यासाठी खालीलप्रमाणे दिलेला आहे.

### श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ :-

या शैक्षणिक संस्थेची स्थापना कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी १९३४ साली केली. संस्थेची स्थापना बार्शी मध्ये प्रथम एका बोर्डिंगच्या स्वरूपांत झाली.पहिल्या

वर्षी या बोर्डिंग मध्ये फक्त १० विद्यार्थी होते. आज या संस्थेमध्ये पूर्वप्राथमिक स्तरापासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत सर्व शाखा आहेत. या संस्थेच्या शाखा सोलापूर व उस्मानाबाद या जिल्हयांत आहेत.

सध्या या संस्थेमध्यें एक पूर्वप्राथमिक शाळा, पांच प्राथमिक शाळा, चौदा माध्यमिक शाळा, एक अध्यापक विद्यालय, पाच महाविद्यालये व एक तंत्रनिकेतन आहे.चौदा माध्यमिक शाळापैकी चार माध्यमिक शाळांमध्यें उच्च माध्यमिक शिक्षणाचीसुद्धा सोय आहे. तसेच पाच महाविद्यालयापैकी एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय असून एक विधी महाविद्यालय आहे. त्याचप्रमाणे किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय शिक्षणाच्या शाखाही बार्शी, येडशी, व वाशी या ठिकाणी आहेत. डी.एम्.एल्.टी कोर्स व नर्सिंग कोर्स या संस्थेमध्ये चालतात. सदर संस्थेमध्ये पूर्वप्राथमिक पासून पीएच्.डी. पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

**शैक्षणिक नियोजन :-**

श्री.ताम्हणकर यांच्या ' शैक्षणिक प्रशासन व नियोजन ' या पुस्तकावरून शैक्षणिक नियोजन म्हणजे ' शैक्षणिक उद्दिष्टे ठराविक कालखंडात साध्य करण्यासाठी, उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळाच्या साह्याने कृतीची कार्यवाही निश्चित करण्याची प्रक्रिया '१

प्रस्तुत संशोधनामध्ये श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेने, संस्थेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी, संस्थेची उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळाचा विचार करून कृतीची कार्यवाही करण्याची जी योजना आखली आहे. ती म्हणजे शैक्षणिक नियोजन होय.

**शैक्षणिक प्रशासन :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये संस्थेच्या प्रशासनाचा अभ्यास आहे. ताम्हणकरांच्या मते, शैक्षणिक प्रशासनात खालील बाबींचा समावेश होतो.

१. शैक्षणिक नियोजन
२. प्रशासनाच्या निरनिराळ्या घटकांतील संबंध आणि सहकार
३. प्रशासनाचे विकेंद्रिकरण
४. वित्तव्यवस्था
५. प्रशासक, शिक्षक, व कर्मचारी वर्गांचे प्रशिक्षण
६. महत्वाच्या साहित्याची तरतूद
७. संशोधनांत आवश्यक बाबींची तरतूद
८. परिणामाचे मूल्यमापन
९. समाज व संस्था यातील संबंध
१०. शैक्षणिक नियोजनाला द्यावयाची प्रसिद्धी
११. संस्थेतील व समाजातील निरनिराळ्या घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजीत करणे आणि कार्यप्रवृत्त करणें.

१२. भविष्यकाळच्या स्वरूपाविषयीचा अंदाज बांधून त्यासंबंधी मार्गदर्शन करणें. २

**चिकित्सक अभ्यास :-**

प्रा. सी. व्ही. गुड यांनी ' डिक्सनरी ऑफ एज्युकेशन ' मध्ये दिलेल्या इंग्रजी अर्थावरून चिकित्सक अभ्यास म्हणजे ' एखाद्या विषयाचा संपूर्ण व सखोल अभ्यास करणे. हा अभ्यास कौशल्यपूर्ण व निश्चित स्वरूपाचा असतो. ती एक अर्थपूर्ण चौकशी असते.' ३

या संशोधनांत कै. डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी स्थापन केलेल्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या शैक्षणिक नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्यांत आलेला आहे.

**१.३ संशोधनाची उद्दिष्टे :-**

संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक नियोजनाचा अभ्यास करणे.

२. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करणे.

३. शैक्षणिक नियोजन व प्रशासन यांत सुधारणा सुचविणे

**१.४ संशोधनाची गरज व महत्त्व :-**

विसावे शतक संपवून आपण लवकरच २१ व्या शतकांत जाणार आहोत. विज्ञानांत आश्चर्यकारक प्रगती होत आहे. संगणकासारख्या तंत्राने मानवी जीवन बदलत चालले आहे. अशा अवस्थेत शिक्षणांतही बदल व्हावयास हवा, ही काळाची गरज आहे. शिक्षणांत आवश्यक तो बदल करण्याचा प्रयत्न शिक्षणतज्ञ, समाजसेवक, शासनव्यवस्था व पालक करीत असतात.

कांहीं व्यक्ती व कांहीं सेवाभावी संघटना शिक्षण क्षेत्रांत कार्य करीत असतात. समाजातील विविध समस्या त्यांच्या संवेदनशील मनाला जाणवतात. त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी ते विविध उपाय योजतात. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना समाजातील अनेक समस्या जाणवल्या. त्या समस्या सोडविण्यास समर्थ बनण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे हे त्यांनी ओळखले. पुणे, मुंबईच्या मानाने सोलापूर जिल्हा शिक्षणाच्या बाबतीत तसा मागासलेला होता. ही जाणीव होवून ' श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ ' या संस्थेची स्थापना मामांनी केली.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळांत झाली. त्या वेळी शिक्षणांसाठी अनुदाने व आज मिळणारे सरकारी सहकार्य उपलब्ध नव्हते. शिक्षणाच्या बाबतीत मागास असलेल्या समाजासाठी ही संस्था मामांनी स्थापन केली. पडत्या व प्रतिकूल काळांत मामांनी या संस्थेची स्थापना करून शैक्षणिक कार्य चालू केले. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भागांत स्थापन झालेल्या या शैक्षणिक संस्थेचा कारभार आज खूपच विस्तारीत असा आहे.

शिक्षणामुळे माणूस घडतो. शिक्षण हे मानवाचे जीवन बदलून टाकणारे एकमेव साधन असून त्याचा जीवनाशी अतूट संबंध जोडलेला असला पाहीजे. या श्रध्देतून कर्मवीर मामांनी हे शैक्षणिक कार्य केले. श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन,स्वाभिमान व राष्ट्रभक्ती या तत्वांचा संस्कार या शिक्षणसंस्थेमधून रुजविला जातो. संस्थेतील विद्यालयांना व वसतीगृहांना जीवनोपयोगी व्यवसायाची जोड दिली आहे. खेड्यातून आलेल्या व आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या विद्यार्थ्यांना ' कमवा आणि शिका ' या तत्वाधारे शिक्षण दिले जाते.

प्रस्तुत संशोधनामुळे सदर संस्थेतील नियोजनाचा व प्रशासनाचा अभ्यास होऊन त्या संबंधीची महत्वाची माहिती मिळणार आहे. प्रतिकूल परिस्थितीत स्थापन झालेल्या संस्थेच्या या यशस्वी विस्ताराचे नियोजन व प्रशासन या संशोधनाद्वारे समजून येणार आहे. म्हणून सदरचे संशोधन महत्वाचे आहे. हे संशोधन संस्थेमधील व्यवस्थापकांना, संस्थेत अध्यापनाचे कार्य करीत असलेल्या शिक्षकांना, संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून उपयोगी ठरेल. या संस्थेच्या यशस्वी नियोजन व प्रशासनाची माहिती सर्व समाजाला प्रस्तुत संशोधनातून होईल.

### १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

१) हे संशोधन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेपुरते मर्यादित आहे.

२) हे संशोधन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक नियोजन व प्रशासनापुरते मर्यादित आहे.

३) हे संशोधन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पूर्वप्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणांपर्यंत मर्यादित आहे.

४) कर्मवीर मामांनी शैक्षणिक संस्थेबरोबरच हॉस्पिटल, आडत दुकान, वाचनालये, छापखाना, कुक्कुटपालन, शेतकरीसंघ, युवक मंडळ, कृषीविज्ञान साप्ताहिक इ. अशैक्षणिक शाखा स्थापन केल्या. संशोधक या सर्व बाबींचा अभ्यास न करता संस्थेच्या फक्त शैक्षणिक कार्याचाच अभ्यास करणार आहे.

५) बार्शी, पानगांव, आगळगांव, काटेगांव, कसबे तडवळे, उपळे दुमाला, उपळाई (ठोंगे), तेर, भातंबरे, चारे, वाशी, उस्मानाबाद, व येडशी, या गावांत कर्मवीर मामांचे शैक्षणिक कार्य झाले आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन हे सोलापूर व उस्मानाबाद या जिल्ह्यातील संस्थेच्या शैक्षणिक क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे.

**१.६ प्रकरणाचे सुसूत्रीकरण :-**

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. प्रश्नावली, मुलाखती, शाखांना भेटी, कागद पत्रांची पाहणी या द्वारे अभ्यासकाने माहिती मिळविली. नंतर मिळलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून संशोधकाने निष्कर्ष काढून कांहीं शिफारसी केल्या आहेत. ही सर्व माहिती प्रकरणांत खालील प्रमाणें सादर केली आहे.

**प्रकरण १ प्रास्ताविक :-**

या प्रकरणांत विषयप्रवेश, संशोधनाचा विषय व संशोधनाच्या विषयामध्ये येत असलेल्या कांहीं शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आणि प्रकरणाचे सुसूत्रीकरण दिले आहे.

**प्रकरण २ - संबंधित साहित्याचा अभ्यास : -**

या प्रकरणांत संबंधित साहित्याचा अभ्यास. संबंधित संशोधनाचा अभ्यास या विषयी माहिती दिली आहे. संबंधित संशोधनाचा विषय, उद्दिष्टे, कार्यपद्धती, व निष्कर्ष दिले आहेत.

**प्रकरण ३ - संशोधनाची कार्यपद्धती :-**

या प्रकरणांत संशोधनाची कार्यपद्धती दिली आहे. त्यामध्ये संशोधनासाठी निवडण्यांत आलेला नमुना व संशोधनासाठी वापरण्यांत आलेली साधने दिली आहेत.

**प्रकरण ४ - संस्थेचा इतिहास :-**

या प्रकरणांत संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा इतिहास दिला आहे.

**प्रकरण ५ - संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

या प्रकरणांत संकलित माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले आहे. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन खालील मथळ्याखाली केले आहे.

१. संस्थेच्या शाखामधील भौतिक सुविधा विषयी माहिती.
२. सर्व शाखांमधील शिक्षकांची माहिती.
३. तेथील अध्यापनाविषयी माहिती.
४. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाविषयी माहिती.
५. संस्थेच्या विकासाविषयी माहिती.
६. संस्थेच्या आर्थिक व्यवस्थेविषयी माहिती.
७. संस्थेच्या भावी योजनेविषयी माहिती

**प्रकरण ६ - निष्कर्ष व शिफारसी :-** या प्रकरणांत संकलित माहिती वरून निष्कर्ष काढले आहेत व योग्य त्या शिफारसी केल्या आहेत. शिवाय पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.

# संदर्भ


१. एस्. डी. ताम्हणकर, :शैक्षणिक प्रशासन व नियोजन, पूणे
नूतन प्रकाशन १९७६
पृष्ठ क्रमांक ४०

२. तदर्थ : पृष्ठ क्रमांक ४

३ Carter V. Good : Dictionary of Education.
New York,
Mcgrew Hill Book
Company, 1959.
Page No. 566.